# शेकर ॲप्लिक ग्रीटिंग कार्ड

**या ट्यूटोरियलमध्ये, तुम्ही शेकर ॲप्लिक, मशीन एम्ब्रॉयडरी केलेले ग्रीटिंग कार्ड त्याच्या एनव्हलपसह कसे तयार करावे हे शिकाल.**




## ग्रीटिंग कार्ड साठी लागणारे साहित्य

**प्री-फ्यूज पांढरा सॅटिनचा कपडा H -34 cm x W -32 cm**
**मध्यम वजनाचा कडक प्रिंटेड कापड H -25 cm x W -22 cm**
**प्लास्टिकचा तुकडा H -16 cm x W -13 cm**
**कार्ड पेपर H -25 cm x W -22 cm**
**संदेश शिवण करायला कार्ड H -18 cm x W- 13 cm**
**सॅटिनची रिबन 24 cm**
**11 जुळणारे रेशमचे धागे**
**तुमच्या आवडीचा लटकण s/s 1**
**तुमच्या आवडीचा ॲप्लिक फिलिंग**
**फॅब्रिक ग्लू**




### एनव्हलप साठी

**फेल्ट H -64 cm x W -31 cm**
**ऑफ व्हाईट धागा**
**बटण 3.5 cm**
**तुमच्या आवडीची सजावट**
**एनव्हलपचे टेम्प्लेट जे तुम्ही www.ushasew.com वरून डाउनलोड करू शकता**

Artistic DIGITIZER
GO AHEAD - BE AN ARTIST

**चला तर मग सुरुवात करूया. लॅपटॉपवर, आर्टिस्टिक डिजिटायझर सॉफ्टवेअर उघडा. ग्रीटिंग कार्डचे डिझाइन आमच्या www.ushasew.com या वेबसाइटवरून डाऊनलोड केले जाऊ शकते. आर्टिस्टिक डिजिटायझर सॉफ्टवेअरमध्ये डिझाइन इंपोर्ट करा.**




**हे सॉफ्टवेअर तुम्हाला जलद आणि सहज व्यावसायिक रिजल्ट मिळवण्यास सक्षम करते. तुमचे स्वतःचे डिझाईन्स तयार करा, त्यास पर्सनल टच द्या आणि विविध पर्यायांच्या भरपूर सिलेक्शन्समधून निवडा. एकदा डिझाईन इम्पोर्ट केल्यास आणि तुम्ही ते वैयक्तिकृत केले की, तुम्ही ते उषा जनोमी मेमरी क्राफ्ट स्कायलाइन एस९ मशीनवर सहजपणे ट्रान्सफर करू शकता कारण ते वायफाय प्रमाणित आहे.**






आता शिवणकाम करूया, मशीन सोबत आलेल्या Re20a हूपची आतील आणि बाहेरील फ्रेम अनस्क्रू करा. प्री-फ्यूज केलेला सॅटिनचा कपडा घ्या आणि तो बाह्य फ्रेमवर ठेवा. हूपची आतील फ्रेम कपड्यावर ठेवा. स्क्रू घट्ट करून फ्रेम्स सुरक्षितपणे एकत्र जोडा आणि नंतर त्याला त्याच ठिकाणी सुरक्षितपणे जोडून ठेवण्यासाठी मॅग्नेटिक क्लिप वापरा.






मशीनला हुप जोडा आणि लॉक करा. मशीन आता तयार आहे. स्टार्ट बटनवर क्लिक करा आणि जादू पाहा. उषा जनोमी मेमरी क्राफ्ट मशीन्स फक्त एक बटन क्लिक करून हे अद्भुत नमुने तयार करण्यात मदत करतात. जारची बाह्यरेखा तयार झाल्यावर मशीन थांबेल. आता प्लास्टिकचा तुकडा घ्या आणि जारवर ठेवा. तयार केलेल्या बाहेरील रेखेपेक्षा प्लास्टिक मोठे असल्याची खात्री करा. पुन्हा स्टार्ट वर क्लिक करा आणि मशीन बाहेरील रेखा प्लॅस्टिकवर तयार करेल;ह्या कृतीमुळे, कपड्यावर प्लास्टिक सुरक्षित होईल.



एकदा हे पूर्ण झाल्यावर, आम्ही मशीनपासून हुप वेगळे करू. आपण पुढे जाण्यापूर्वी जार भरूया. आम्ही काही लुज सेक्वीनसह सुरवात करणार आहोत. प्लास्टिक हळूवारपणे उचला आणि दाखवल्याप्रमाणे सेक्विन ओतणे सुरू करा. तुम्ही ही प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक करत आहात याची खात्री करा जेणेकरून टाके उसवणार नाहीत. सेक्विन योग्यरित्या भरलेले असल्याचे सुनिश्चित करा.




चला पुढे जाऊ आणि शिलाई मशीनने शिवलेले प्रेमाचे भाव जोडू. हळुवारपणे हे टॅग ॲप्लिक जारमध्ये भरा. सर्व फिलिंग सुबकपणे आत भरलेले आहे आणि दाखवल्याप्रमाणे जारच्या ओपनिंगखाली आहे याची खात्री करा.

आता मशीनकडे वळूया. मशीनवर हूप ठेवा आणि त्यास जागेवर लॉक करा. स्टार्ट बटनवर क्लिक करा आणि मशीन आता जारचे ओपनिंग बंद करेल. ओपनिंग सीलबंद आणि सुरक्षित झाल्यानंतर, आता आपल्याला एक्स्ट्रा राहिलेले प्लास्टिक कापावे लागेल.




स्टिच लाइन आणि बेस फॅब्रिक न कापता डिझाइनच्या बाहेरील एक्स्ट्रा प्लास्टिक हळूवारपणे कापून टाका.



हूप परत मशीनवर लॉक करा आणि आता आरामशीर बसा तोपर्यन्त मशीन तुमचे संपूर्ण डिझाइन पूर्ण करेल. उषा जनोमी मेमरी क्राफ्ट मशिन मॉडेल्सच्या सहाय्याने तुम्ही अत्यंत क्रिएटिव बनू शकता, फॅब्रिक, कागद आणि प्लॅस्टिक यांसारख्या विविध सामग्रीचा वापर करून तुमचे प्रोजेक्ट सुशोभित करण्यासाठी अनोखे ऍप्लिक तंत्र आणि कल्पना जाणून घेऊ शकता. मशीन आपोआप थांबेल आणि आपल्याला थ्रेड बदलण्यासाठी सूचित करेल.  पॅनेलवर दर्शविल्याप्रमाणे थ्रेड निवडा . (स्टार्ट बटन दाबा) .मशीन आता हार्ट शेप्स तयार करण्यास सुरवात करेल. सूचित केल्याप्रमाणे रंग बदलत रहा.




तुमचे भाव किती सुंदरपणे जिवंत होतात ते पहा. या भरतकामाचा शेवटचा भाग म्हणजे बॉर्डर. मशीन तुमच्यासाठी तेही करेल. शेवटी मशीन आपोआप थांबते. मशीनमधून हुप काढा आणि फॅब्रिक अनहूप करा. पूर्ण झालेले एम्ब्रॉयडरी कार्ड असे दिसेल.
सुंदर  आहे  ना!









फॅब्रिकचा अधिकचा तुकडा कापून टाका.  हे करताना किनार कट होणार नाही ह्याची काळजी घ्या. पुढील स्टेपसाठी, आम्ही हा एम्ब्रॉइडरी पॅच कापडाच्या प्रिंटेड तुकड्यावर शिवणार आहोत. आम्ही याला रिबन देखील जोडणार आहोत. प्रिंटेड फॅब्रिकवर एम्ब्रॉइडरी पॅच ठेवा. आता दाखवल्याप्रमाणे पॅचवर रिबन ठेवा. एम्ब्रॉइडरी पॅचवर रिबन पिन करा. रिबनचे टोक दुमडून त्याला जागेवर सुरक्षित करा.




आता शिवणकाम करूया. आम्ही सिलाई मोडवर मशीन सेट केली आहे. रिबन, ऍप्लिक फॅब्रिक आणि प्रिंटेड बेस फॅब्रिक एकत्र जोडण्यासाठी रिबनच्या दोन्ही बाजूंना सरळ स्टिच करून  टाका लॉक करण्यासाठी शेवटी उलटी शिलाई करा. टाके असे दिसतील. बॉर्डरच्या रंगाशी जुळण्यासाठी धागा बदला आणि सर्व बाजूंनी शिवा.

अद्भुत. तुम्ही आत्ताच तुमचा एम्ब्रॉयडरी लेयर तयार केला आहे. बॉर्डरवरील शिलाई अशी दिसेल.









आता पुढील स्टेप, कार्ड पेपरवर फॅब्रिक पेस्ट करा. हे करण्यासाठी तुम्ही बाजारात उपलब्ध असलेला कोणताही फॅब्रिक ग्लू वापरू शकता. फॅब्रिक ग्लू कार्डाच्या वरच्या बाजूस लावा आणि फॅब्रिक हळूवारपणे कार्डावर ठेवा.

तुम्ही कडा जुळत असल्याची खात्री करा, नंतर सर्वत्र हलका दाब द्या आणि ते जागी सुरक्षित करा. आम्ही फॅब्रिक सुरक्षित करण्यासाठी लाकडी क्लिप वापरत आहोत आणि आम्ही ते जवळपास २  तास कोरडे राहू देणार आहोत. आम्ही पुढे हार्ट शेप्स टॅसलचा वापर करून कार्ड सजवणार आहोत. आम्ही हे टॅसल जारच्या ओपनिंगवर ठेवणार आहोत   हे जागेवर सुरक्षित करण्यासाठी दर्शविल्याप्रमाणे तोच फॅब्रिक ग्लू वापरा.




उषा मेमरी क्राफ्ट मशीन्सची रेंज आपल्याला कागदावर मोनोग्राम करण्यास देखील मदत करते. याचा फायदा घेत आपण कागदावर मेसेज पर्सनालाईझ करणार आहोत. कागदावर शिवण्यापूर्वी तुम्ही सुई बदलली आहे याची खात्री करा. आपल्या प्रिय व्यक्तींच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा हा एक अनोखा मार्ग आहे.





तुमच्या कार्डच्या आतील बाजूस हा कागद दाखवल्याप्रमाणे चिकटवा. तुमचे कार्ड आता तयार आहे.









आपल्याला आता एक एनव्हलप तयार करायचा आहे जो या सुंदर कार्डला पूरक असेल. आता फेल्टचा एक तुकडा घेऊया. एनव्हलपचे टेम्प्लेट फेल्टवर ठेवा. हे टेम्पलेटआमच्या वेबसाइट www.ushasew.com वरून डाऊनलोड केले जाऊ शकते. फेल्टवर टेम्पलेट पिन करा. आता वॉटर सोल्युबल मार्कर घ्या आणि फेल्टवर टेम्प्लेटची आउटलाइन काढा. फोल्ड लाइन्स मार्क करण्यास विसरू नका. ट्रेसिंग पूर्ण करा आणि नंतर टेम्पलेट अनपिन करा. मार्क केलेली लाइन कात्रीने कापा. कडा काळजीपूर्वक कापा.



आम्ही एनव्हलप देखील येथे दर्शविल्याप्रमाणे फॅब्रिक आणि रिबन आणि सेक्विनने सुशोभित केला आहे. ते शिकण्यासाठी तुम्ही आमच्या वेबसाइटवरील धडा क्रमांक ११ , १२ आणि १८ पाहू शकता.

एनव्हलप उघडू नये म्हणून बटण वापरून सुरक्षित केले जाऊ शकते जे तुम्ही आमच्या वेबसाइटवरील धडा क्रमांक नऊ वरून कसे शिवायचे ते शिकू शकता.





एनव्हलप फोल्ड करा आणि फोल्ड लाइनच्या बाजूने क्रीज करा. एनव्हलपचा आकार तयार करण्यासाठी आम्ही फक्त दोन क्विक सरळ टाके घालणार आहोत. तुम्ही क्लिप वापरून ओपन एंड्स सुरक्षित करू शकता. चला शिवणकाम सुरू करूया.




बस एवढेच. एनव्हलप आता तयार आहे. ते तुमच्या हाताने बनवलेल्या कार्डशी किती परफेक्ट जुळत आहे ते पहा. आशा आहे की तुमच्या DIY ग्रीटिंग कार्डवर काम करण्यासाठी तुम्ही उत्सुक आहात. तुम्ही आणखी एक पाऊल पुढे जाऊन त्याच ॲप्लिक डिझाईनसह कुशन, हँडबॅग, वॉल हँगिंग इ. तयार करू शकता.